8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## दिव्यांगांसाठी मदत केंद्र कार्यान्वित करणार

### जिल्हाधिकारी मित्तल; लायन्स क्लब आणि मनपातर्फे ३९५ दिव्यांगांची आरोग्य तपासणी

**जालना । प्रतिनिधी** - शारीरिक दृष्ट्या कमजोर असले तरी सक्षम असलेल्या दिव्यांगांना मदत करण्यास प्रशासन सदैव तत्पर असून दिव्यांगांनी मनाने सक्षम व्हावे त्यांच्या मदतीसाठी स्वतंत्रपणे दिव्यांग मदत केंद्र आगामी काळात कार्यान्वित करणार असल्याची घोषणा जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी आज केली.

आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिनानिमित्त बुधवारी ( ता ०३) लायन्स क्लब ऑफ जालना आणि जालना शहर महानगरपालिकेच्या वतीने मनपा कार्यालयात दिव्यांगांसाठी आयोजित मोफत आरोग्य व नेत्र तपासणी शिबिर शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी जिल्हाधिकारी मित्तल बोलत होत्या. यावेळी उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे ,समाज कल्याण अधिकारी स्नेहल मुधाळे ,अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम ,लायन्स क्लब ऑफ जालना चे अध्यक्ष राधेश्याम टिबडेवाल ,सचिव राजेश खिस्ते,कोषाध्यक्ष रतन बजाज,डॉ. गिरीश पाकणीकर,अरुण मित्तल,प्रकल्प प्रमुख डॉ. संगीता राजे -देशमुख,द्वारकादास मुंदडा , डॉ. प्रकाश सिगेदार,उपायुक्त नंदा गायकवाड,सहाय्यक आयुक्त केशव कानपुडे,अनुराधा नागोरी,अपर्णा जाधव,आलेक जेकब, सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे,लायन्स क्लबचे बळीराम बेंद्रे, पी.के .खरात, विठ्ठलराव दराडे , बोरूडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी मित्तल म्हणाल्या, दिव्यांगांच्या भावना प्रशासनापर्यंत पोहोचण्याकरिता जिल्हा सामान्य रुग्णालय परिसरात सेंटरची उभारणी केली जाणार असून दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी जिल्हा नियोजन विकास समिती, महानगरपालिका यांच्या माध्यमातून विशेष निधी राखीव ठेवण्यात आला आहे. यातून नियमात बसणारे विकासात्मक कार्य केले जातील असे नमूद करत तालुका स्तरावर गट संसाधन केंद्रासाठीही निधीची तरतूद केली असल्याचे जिल्हाधिकारी मित्तल यांनी सांगितले.शिक्षण आणि रोजगार यावर दिव्यांगांनी लक्ष केंद्रित करावे असे आवाहन जिल्हाधिकारी मित्तल यांनी केले.



उपायुक्त नंदा गायकवाड यांनी कामानिमित्त मनपा कार्यालयात येणाऱ्या दिव्यांगांसाठी विल चेअर उपलब्ध करून दिली असून खालच्या मजल्यावरच कार्यालय स्थलांतरित केली जाईल असे गायकवाड यांनी सांगितले.

डॉ.प्रकाश सिगेदार यांनी अस्थिव्यंग आणि जन्मतः दिव्यांगाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आढळते. शासन, स्वयंसेवी संस्था यांनी दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करावे असे त्यांनी नमूद केले.

सकल दिव्यांग संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे यांनी डीपीडीसी, समाज कल्याण, महानगरपालिकेकडून दिव्यांगांसाठी राखीव निधी ठेवला जात असला तरी योग्य प्रमाणात खर्च होत नसल्याचे सडेतोड मत त्यांनी व्यक्त केले. शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहर प्रमुख विष्णू पाचफुले ,मीनाक्षी दाड, विजय दाड, यांनी भेट देऊन दिव्यांगांचा सत्कार केला.

सुत्रसंचालन डॉ.दीपक भालेराव यांनी केले तर प्रमिला मोरे यांनी आभार मानले. यावेळी मोहन मुंडे अनिल मगदूले सतीश फतपुरे सतीश वाघ यासह मनपाचे कर्मचारी दिव्यांग बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**३९५ जणांना लाभ....!**

दिवसभर चाललेल्या मोफत नेत्र व आरोग्य तपासणी शिबीरात ८९ दिव्यांगांची नेत्र तपासणी करण्यात आली.कॅट्रॅक्ट ऑपरेशन चे रुग्ण ६ आढळून आले. आरोग्य तपासणी (७०),रक्त तपासणी(२२), करण्यात आली.१३३ जणांना क्षयरोगबाबत मार्गदर्शन करून ८१ जणांचे आयुष्मान कार्ड काढण्यात आले.एकूण ३९५ दिव्यांग बांधवांनी शिबीराचा लाभ घेतला.

## महाराष्ट्र बांबू उद्योग धोरण ठरणार 'ग्रीन गोल्ड'; शेतकऱ्यांसाठी रोजगार व उत्पन्नाची मोठी संधी

### शेतकऱ्यांनी या क्रांतीचा भाग व्हावे - डॉ. कुलकर्णी

**जालना । प्रतिनिधी** - हवामान बदल आणि अनिश्चित पावसामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने नुकतेच जाहीर केलेले महाराष्ट्र बांबू उद्योग धोरण २०२५ एक अत्यंत दिलासादायक आणि क्रांतिकारी असून, शेतकऱ्यांसाठी शाश्वत उत्पन्नाचा मार्ग आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी 'गेम चेंजर' ठरणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी या क्रांतीचा एक भाग व्हावे, असे आवाहन बांबू लागवड चळवळीचे जालना जिल्हा समन्वयक डॉ. सुयोग कुलकर्णी यांनी केले आहे.



या धोरणाविषयी अधिक माहिती देताना डॉ. कुलकर्णी म्हणाले की, २ डिसेंबर रोजी उद्योग विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित केला आहे. बांबूला केवळ गवत न मानता त्याला 'शेतीपूरक व्यवसाय' आणि 'उद्योग' म्हणून राजाश्रय मिळाला आहे. मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूद, राज्यातील औष्णिक वीज प्रकल्पांमध्ये कोळसाऐवजी बांबूचा वापर होणार असल्याने हक्काची बाजारपेठ, गुंतवणूक आणि रोजगार, तोडणी व वाहतूक मुक्त ही या धोरणाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने पहिल्या पाच वर्षांसाठी १५३४ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. तसेच पुढील २० वर्षासाठी तब्बल ११,७९७ कोटी ११,७९७ रुपये खर्चाला मंजुरी देण्यात आली आहे. यावरून सरकार या विषयावर किती गंभीर आहे हे स्पष्ट होते. शेतकऱ्यांचा बांबू कोण विकत घेणार? या प्रश्नाचे उत्तर या धोरणात मिळाले आहे. राज्यातील औष्णिक ऊर्जा प्रकल्पांमध्ये वापरल्या जाणाऱ्या कोळशामध्ये पाच ते सात टक्के बांबूपासून बनवलेले बायोमास वापरणे सक्तीचे करण्यात आले आहे. यामुळे बांबूला आपोआपच मोठी आणि हक्काची बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. या धोरणातून राज्यात ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून, पुढील १० वर्षांत प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या पाच लाखाहून अधिक रोजगार अप्रत्यक्षरित्या निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. २०१७ मध्ये भारतीय वन कायद्यात सुधारणा करून खाजगी जमिनीवर उगवलेल्या बांबूला 'वृक्ष' या व्याख्येतुन वगळले आहे. त्यामुळे बांबू तोडण्यासाठी किंवा वाहतुकीसाठी कोणत्याही परवान्याची गरज उरलेली नाही, त्यामुळे मोठा अडथळा दूर झालेला असल्याचे डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले. जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडे पर्यायी शाश्वत उत्पन्न देणारे पीक म्हणून अथवा पडीक जमीन किंवा बांधावर बांबू लागवड करण्याची मोठी संधी आहे. आशिया खंडात बांबूचा वापर आणि मागणी वाढत आहे. अशा वेळी कमी पाण्यात आणि कमी देखभालीत येणारे बांबूचे पीक शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य देईल. शासनाच्या या धोरणामुळे बांबू प्रक्रिया उद्योग, फर्निचर, बांधकाम साहित्य आणि उर्जा क्षेत्रात मोठी क्रांती होणार आहे.

तरी जालना जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आणि नवउद्योजकांनी या बांबू लागवड चळवळीत सहभागी होऊन शासनाच्या या महत्त्वाकांक्षी धोरणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. सुयोग कुलकर्णी यांनी केले आहे.

युवा आदर्श

### जीवदान ...

शब्द माझे पडे थिटे
असे स्वामी महिमान
सुरू राही नामस्मरण
गळले व्यर्थ अभिमान
मायमाऊली कनवाळू
भक्तावर सदैव ध्यान
का सांगू तुज गाऱ्हाणे
तुला असे सकल ज्ञान
अंकीत रे अवघीसृष्टी
भूत भविष्य वर्तमान
दत्तमूर्ती साक्षात उभी
म्हणता सूत्र पवमान
निर्भय निशंक बनवी
पाठी सावली समान
भक्त गण झालो तुझा
जगण्या मिळे सन्मान
कळीकाळास जिंकून
दिलेस कैक जीवदान
माझा मी राहिलो कुठे
तुला अर्पण जीव दान
वट वृक्ष शत धन्य तो
जिथे तव वसतीस्थान
कर्दळीवन भारावलेले
केले श्रीशैल्या प्रस्थान

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

झाडे लावा
झाडे जगवा

टेंभुर्णी नगरीत दत्त जयंतीनिमित्त
येणाऱ्या सर्व भाविक-भक्त व नागरिकांचे
हार्दिक शुभेच्छा

ग्रामपंचायत सदस्य, टेंभुर्णी
जिल्हाउपाध्यक्ष, अखिल भारतीय महात्मा
फुले समता परिषद, जालना.
प्रा. रवींद्र त्रंबकराव उखर्डे
टेंभुर्णी, ता. जाफ्राबाद जि. जालना.

दत्त जयंतीनिमित्त
सर्व नागरिकांना हार्दिक स्वागत
व यात्रेकरुंचे हार्दिक शुभेच्छा

योगेश शर्मा
टेंभुर्णी विभाग प्रमुख, शिवसेना (उद्धव ठाकरे)
ता. जाफ्राबाद, जि. जालना

टेंभूर्णी यात्रे निमित्त सर्व भाविकांना
हार्दिक शुभेच्छा
यात्रेनिमित्त
येणाऱ्या सर्व
भाविकांचे
हार्दिक
स्वागत

देवराव मालुबा देशमुख, अध्यक्ष
दत्त संस्थान टेंभुर्णी, ता. जाफ्राबाद जि. जालना
व संचालक मंडळ

दत्त जयंती व यात्रानिमित्त सर्व
भाविक भक्तांना हार्दिक शुभेच्छा
संजीवनी
प्री प्रायमरी इंग्लिश स्कुल टेंभुर्णी
अध्यक्षा : सौ. ज्योती सांगळे मॅडम
सचिव : प्रा. सतिश जाधव
सहसचिव : सौ. भाग्यश्री जाधव मॅडम
सहशिक्षिका : वैशाली पंडीत मॅडम,
शील जाधव मॅडम, हिना शेख मॅडम
संचालक
प्रा. सतीश जाधव, श्री रामेश्वर सांगळे,
सौ. ज्योती सांगळे
आरजे अँण्ड संजीवनी क्लासेस टेंभुर्णी

टेंभुर्णी यात्रेनिमित्त व दत्त जयंतीच्या
हार्दिक शुभेच्छा


सचिन म्हस्के पाटील
गुळाचा चहा
राजुरेश्वर
टी हाऊस
प्रसिद्ध गुळाचा चहा
व ताजा नाष्टा
जिनिंग चौक, टेंभुर्णी,
ता. जाफ्राबाद जि. जालना.

## जालना शहरात लोकनेते कै. बलीराम यादव यांची पुण्यतिथी साजरी

**जालना । प्रतिनिधी -** झोपडपट्टी विकास आणि समाजसेवा क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावणारे लोकनेते कै. बलीराम यादव यांची २३ वी पुण्यतिथी जालना शहरात अत्यंत श्रद्धा, आदर आणि भावनिक वातावरणात साजरी करण्यात आली. शहरातील विविध भागांमध्ये आयोजित कार्यक्रमांत प्रशासकीय अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, शैक्षणिक संस्था, तसेच मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग घेऊन त्यांना विनम्र अभिवादन केले.

जालना महानगरपालिका कार्यालयात आयोजित विशेष श्रद्धांजलि कार्यक्रमात झोपडपट्टी विकासाचे जनक आणि ज्येष्ठ समाजसेवक बलीराम भैय्या यादव यांना अधिकाऱ्यांसह नागरिकांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी सहायक आयुक्त अर्पणा जाधव, अनुराधा नागोरी, केशव कानपुडे, कार्यालय अधीक्षक विजय फुलंब्रीकर, बंडू चव्हाण, रत्नपारखे, म ोरे, राहुल देशमुख, माजी नगरसेवक महेश निकम, संतोष जाधव, गोकुल स्वामी, अमरदीप शिंदे आदी उपस्थित होते.

दधीमती चौकात लोकनेता बलीराम यादव मार्गवरील पाटीसम ोर स्वच्छता निरीक्षक राहुल हिवाळे, विनोद यादव, राजू आर्य, संजय लोखंडे, दिनेश कुरील, दिनेश मंडोरे, भरत नरवैय्ये, पवन यादव यांच्यासह नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी पुष्पहार अर्पित करून श्रद्धांजली वाहिली.

दलित नेते काशीनाथ साल्वे आणि श्रावण पवार यांनी बलीराम यादव यांच्या संघर्षमय जीवनाची, समाजसेवेची आणि गरीब-वंचित वर्गासाठी केलेल्या समर्पित कार्याची आठवण करून देत उपस्थितांना प्रेरित केले. शहरभर आयोजित या श्रद्धांजलि कार्यक्रमांतून लोकनेते बलीराम यादव यांचे समाजसेवी योगदान, कार्यतत्परता आणि मानवसेवेप्रती असलेले निष्ठापूर्ण समर्पण पुन्हा अधोरेखित झाले. नागरिकांनी सांगितले की, बलीराम यादव यांचे कार्य आजही समाजासाठी प्रेरणादायी आहे. या कार्यक्रमांत श्रीकृष्ण हिंदी विद्यालयाचे अध्यक्ष विनोद यादव, सचिव अभयकुम ार यादव, दलितनेते काशीनाथ साल्वे, लक्ष्मण क्षीरसागर, श्रावण पवार, आर. पी. निकस, गोपाल खवले, वंश यादव, अंश यादव आणि सारांश यादव उपस्थित होते.

# जालन्यात दुय्यम निबंधक कार्यालयात 'रजिस्ट्री' घोटाळा?

## गुंठेवारी व्यवहारांमध्ये मोठा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप; रजिस्ट्री अधिकाऱ्यांच्या मालमत्तेच्या चौकशीची मागणी

**जालना । प्रतिनिधी –** महाराष्ट्र शासनाने गुंठेवारीच्या प्रश्नावर नुकताच दिलासा देणारा निर्णय घेतला असला तरी, जालना येथील दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये बेकायदेशीर गुंठेवारी रजिस्ट्री करून देण्याचा मोठा भ्रष्टाचार उघडकीस आल्याचा खळबळजनक दावा सामाजिक कार्यकर्ते साद बिन मुबारक यांनी केला आहे.

सामाजिक कार्यकर्ते साद बीन मुबारक यांनी याप्रकरणी जिल्हाधिकारी साहेब, जालना यांच्याकडे लेखी तक्रार केली असून, संबंधित दुय्यम निबंधक पैसे घेऊन सर्रासपणे बेकायदेशीर व्यवहार करत असल्याचा गंभीर आरोप केला आहे. जिल्हाधिकारी यांच्या व्यतिरिक्त राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि विभागिय आयुक्त,छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे सुध्दा लेखी तक्रार केली असल्याचे मुबारक यांनी म्हटले आहे.

दिलेल्या लेखी तक्रारीनुसार, जालन्यातील दुय्यम निबंधक कार्यालयात गुंठेवारी भूखंडांच्या रजिस्ट्रीसाठी शासनाच्या नियम ांनुसार असलेल्या महसूल रकमेपेक्षा चार ते पाच पट अधिक रक्कम एजंट आणि अधिकाऱ्यांमार्फत घेतली जात आहे. तक्रारदार साद बीन मुबारक यांनी रजिस्ट्रीच्या एका व्यवहाराचा विशिष्ट संदर्भ दिला आहे. दि. २१/११/२०२५ रोजी झालेली ही रजिस्ट्री गुंठेवारी रजिस्ट्री बंद असतानाही बेकायदेशीरपणे केल्याचे त्यांचे म्हणणे आहे. या रजिस्ट्रीसाठी चलनाची रक्कम केवळ रु. ९,६७०/– भरली गेली असताना, संबंधित अधिकाऱ्याने या प्रकरणात सुमारे रु. ४० हजार रू. अधिकचे घेतल्याचा थेट आरोप तक्रारदाराने केला आहे. या भ्रष्टाचाराचे स्पष्टीकरण देणारे आणि अधिकाऱ्यांनी रक्कम घेतल्याची कबुली देणारे एका एजंटसोबतचे संभाषणाचे रेकॉर्डिंग आपल्याकडे उपलब्ध असल्याचेही अर्जदारांनी नमूद केले आहे.

तक्रारीत म्हटले आहे की, जर शासनाने तुकडेबंदी कायदा रद्द केला असेल, तर अधिकारी जास्त पैसे घेऊन रजिस्ट्री करून देत आहेत आणि जर कायदा लागू असेल, तर चिरिमिरी (लाच) घेऊन बेकायदेशीर व्यवहार करत आहेत. 'दोन्ही प्रक्रिया बेकायदेशीर असून, जालना शहर व परिसरात हजारो गुंठेवारी प्लॉटच्या रजिस्ट्रीमध्ये अशा प्रकारे शासनाच्या महसुलाला चुना लावला जात आहे,' असे तक्रारदारांनी म्हटले आहे.

या अधिकाऱ्यांवर यापूर्वीही भ्रष्टाचाराचे अनेक अर्ज सादर झाले आहेत, परंतु त्यांचे काहीही झाले नसल्याचे समोर आले आहे. अधिकारी 'प्रॉपर जालना' येथील असल्याने त्यांना ओळखीचा फायदा होत आहे. तसेच, त्यांचे राजकीय वर्तुळ मोठे असल्यामुळे त्यांची



कोठेही बदली झाली तरी ते परत जालना येथे बदली करून घेतात आणि भ्रष्टाचाराचे जाळे पसरवीत असल्याचे तक्रारीत स्पष्ट म्हटले आहे.

सामाजिक कार्यकर्ते साद बीन मुबारक यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी केली आहे की, दुय्यम निबंधक कार्यालयातील या मोठ्या भ्रष्टाचाराची त्वरित चौकशी करण्यात यावी, संबंधित अधिकाऱ्याने भ्रष्टाचारातून जमवलेल्या बेकायदेशीर मालमत्तेची चौकशी करण्यात यावी, यातील दोषी अधिकाऱ्यांवर त्वरित निलंबन/बडतर्फीची कठोर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.

जालना जिल्ह्यात 'तुकडेबंदी' आणि 'गुंठेवारी' व्यवहारांमध्ये होत असलेल्या या गंभीर आरोपांमुळे सामान्य नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आता यावर कोणती कारवाई केली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# दत्त जयंतीचे महत्त्व

एक सांप्रदायिक जन्मोत्सव. म ार्गशीर्ष पौर्णिमेच्या दिवशी मृग नक्षत्रावर सायंकाळी दत्ताचा जन्म झाला, म्हणून त्या दिवशी दत्ताचा जन्मोत्सव सर्व दत्तक्षेत्रांत साजरा होत असतो.

१. दत्त जयंतीचे महत्त्व - दत्त जयंती या दिवशी दत्ततत्त्व हे पृथ्वीतलावर नेहमीच्या तुलनेत १००० पटीने कार्यरत असते. या दिवशी दत्ताची मनोभावे नामजपादी उपासना केल्यास दत्ततत्त्वाचा अधिकाधिक लाभ मिळण्यास साहाय्य होते.

२. जन्मोत्सव साजरा करणे - दत्त जयंती साजरी करण्यासंबंधाने शास्त्रोक्त असा विशिष्ट विधी आढळून येत नाही. या उत्सवापूर्वी सात दिवस गुरुचरित्राचे पारायण करण्याचा प्रघात आहे. यालाच गुरुचरित्रसप्ताह असे म्हणतात. भजन, पूजन आणि विशेषकरून कीर्तन वगैरे भक्तीचे प्रकार प्रचारात आहेत. महाराष्ट्रात औदुंबर, नरसोबाची वाडी, गाणगापूर इत्यादी दत्तक्षेत्रांत या उत्सवाला विशेष म हत्त्व असते. तामिळनाडूमध्येही दत्त जयंतीची प्रथा आहे. दत्त जयंती या दिवशी काही ठिकाणी दत्तयाग केला जातो.

**दत्तयाग**

दत्तयाग यामध्ये पवमान पंचसूक्ताच्या आवृत्त्या (जप) आणि त्याच्या दशांशाने किंवा तृतीयांशाने घृत (तूप) आणि तीळ यांनी हवन करतात. दत्तयागासाठी केल्या जाणार्या जपाची संख्या निश्चित नाही. स्थानिक पुरोहितांच्या सम ादेशानुसार जप आणि हवन केले जाते.

पुराणांनुसार जन्माचा इतिहास - अत्रीऋषींची पत्नी अनसूया ही पतीव्रता होती. पातिव्रत्यामुळे तिच्या अंगी एवढे सामर्थ्य आले की, इंद्रादी देव घाबरले आणि ब्रह्मा, विष्णु आणि महेश यांकडे जाऊन म्हणाले, ''तिच्या वराने कोणालाही देवांचे स्थान मिळू शकेल किंवा कोणीही देवांना मारू शकेल; म्हणून तुम्ही काहीतरी उपाय करा, नाहीतर आम्ही तिची सेवा करू.'' हे ऐकून त्रिमूर्ती म्हणाले, ''एवढी काय मोठी पतीव्रता, सती आहे, ते आपण पाहू.''

एकदा अत्रीऋषी अनुष्ठानासाठी बाहेर गेल्यावर अतिथींच्या वेशात त्रिमूर्ती आले आणि अनसूयेकडे त्यांनी भिक्षा मागितली. त्यावर अनसूयेने सांगितले, ''ऋषी अनुष्ठानासाठी बाहेर गेले आहेत. ते येईपर्यंत थांबा.'' तेव्हा त्रिमूर्ती अनसूयेला म्हणाले, ''ऋषींना परत यायला वेळ लागेल. आम्हाला खूप भूक लागली आहे. लगेच अन्न द्या, नाहीतर आम्ही दुसरीकडे जाऊ. ऋआश्रमात आलेल्या अतिथींना तुम्ही इच्छाभोजन देता', असे आम्ही ऐकले आहे; म्हणून इच्छाभोजन करण्यास आम्ही आलो आहोत.'' मग अनसूयेने त्यांचे स्वागत केले आणि जेवायला बसण्याची विनंती केली. त्याप्रमाणे ते जेवायला बसले. ती जेवण वाढायला आल्यावर ते म्हणाले, ''तुझे सुंदर रूप पाहून आमच्या मनात अशी इच्छा झाली आहे की, तू विवस्त्र होऊन आम्हाला वाढावेस.'' त्यावर 'अतिथीला विन्म ुख पाठवणे अयोग्य होईल. माझे मन निर्मळ आहे, मग कामदेवाची काय बिशाद आहे ? माझ्या पतीचे तपफळ मला तारील', असा विचार करून ती अतिथींना म्हणाली, ''मी तुम्हाला विवस्त्र होऊन वाढीन. तुम्ही आनंदाने भोजन करा.'' मग स्वयंपाकघरात जाऊन पतीचे चिंतन करून तिने विचार केला की, 'अतिथी माझी मुले आहेत' आणि विवस्त्र होऊन वाढायला आली. पहाते तो अतिथींच्या जागी रडणारी तीन लहानबाळे ! त्यांना कडेवर घेऊन तिने स्तनपान करवले आणि बाळांचे रडणे थांबले. इतक्यात अत्रीऋषी आले. तिने त्यांना सर्व वृत्तान्त सांगितला. ती म्हणाली, ''स्वामिन् देवेन दत्तं ।'' याचा अर्थ असा आहे - 'हे स्वामी, देवाने दिलेली (मुले).' यावरून अत्रींनी त्या मुलांचे नामकरण 'दत्त' असे केले. बाळे पाळण्यात राहिली आणि ब्रह्मा, विष्णु आणि महेश त्यांच्यासम ोर उभे राहिले आणि प्रसन्न होऊन 'वर मागा', असे म्हणाले. अत्री आणि अनसूयेने 'बालके आमच्या घरी रहावी', असा वर मागितला. पुढे ब्रह्मदेवापासून चंद्र, विष्णूपासून दत्त आणि शंकरापासून दुर्वास झाले. तिघांपैकी चंद्र आणि दुर्वास तप करण्यास जाण्यासाठी अनुमती घेऊन अनुक्रमे चंद्रलोकी आणि तीर्थक्षेत्री गेले. तिसरा दत्त विष्णुकार्यासाठी भूतलावर राहिला.

**दत्त अवतार**

दत्ताच्या परिवाराचा भावार्थ - दत्ताच्या पाठीमागे असलेली गाय म्हणजे पृथ्वी आणि चार श्वान म्हणजे चार वेद. औदुंबराचा वृक्ष हे दत्ताचे पूजनीय रूप आहे; कारण त्यात दत्ततत्त्व जास्त प्रमाणात असते.

दत्तगुरूंनी पृथ्वीला गुरु केले आणि पृथ्वीप्रमाणे सहनशील आणि सहिष्णु असावे अशी शिकवण घेतली. तसेच अग्नीला गुरु करून, हा देह क्षणभंगूर आहे, अशी शिकवण अग्नीच्या ज्वालेपासून घेतली. अशाप्रकारे चराचरांतील प्रत्येक वस्तूमध्ये ईश्वराचे अस्तित्व पहाण्यासाठी म्हणून दत्तगुरूंनी चोवीस गुरु केले.

'श्रीपाद श्रीवल्लभ' हा दत्ताचा पहिला अवतार आणि ऋश्री नृसिंह सरस्वती' हा दुसरा अवतार होय. तसेच ऋमाणिकप्रभु' तिसरे आणि ऋश्री स्वामी समर्थ महाराज' हे चौथे अवतार होत. हे चार पूर्ण अवतार असून अंशात्मक अवतार अनेक आहेत. जैनपंथीय दत्तगुरूंकडे ऋनेमिनाथ' म्हणून पहातात आणि मुसलमान ऋफकिराच्या वेशात' पहातात.

दत्त दररोज खूप भ्रमण करीत. ते स्नानासाठी वाराणसीला, चंदनाची उटी लावायला प्रयागला जात, तर दुपारची भिक्षा कोल्हापूरला मागत आणि दुपारचे जेवण पांचाळेश्वर, बीड जिल्हा येथे गोदावरीच्या पात्रात घेत असत. तांबुलभक्षणासाठी मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात राक्षसभुवन येथे जात, तर प्रवचन आणि कीर्तन ऐकण्यासाठी नैमि ष्यारण्यात बिहार येथे पोहोचत. निद्रेसाठी मात्र माहूरगडावर जात आणि योग गिरनार येथे करीत.

दत्तपूजेसाठी सगुण मूर्तीऐवजी पादुका आणि औदुंबरवृक्ष यांची पूजा करतात. पूर्वी मूर्ती बहुदा एकमुखी असायची. हल्ली त्रिमुखी मूर्ती जास्त प्रचलीत आहे. दत्त हा गुरुदेव' आहे. दत्तात्रेयांना परम गुरु मानले आहे. त्यांची उपासना गुरुस्वरूपातच करावयाची असते. श्री गुरुदेव दत्त', श्री गुरुदत्त' असा त्यांचा जयघोष करतात. दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा' ही नामधून आहे.

दत्तात्रेयाच्या खांद्याला एक झोळी असते. तिचा भावार्थ याप्रमाणे आहे - झोळी हे मधुमक्षिकेचे (मधम ाशीचे) प्रतीक आहे. मधमाशा जशा ठिकठिकाणी जाऊन मध गोळा करतात आणि तो एकत्र जमवितात, तसे दत्त दारोदारी फिरून झोळीम ध्ये भिक्षा जमवतो. दारोदारी हिंडून भिक्षा मागितल्याने अहं लवकर कमी होतो; म्हणून झोळी ही अहं नष्ट झाल्याचेही प्रतीक आहे.

दत्त जयंती उत्सव भावपूर्ण होण्यासाठी हे करा !

स्त्रियांनी नऊवारी साडी अन् पुरुषांनी सदरा-धोतर / पायजमा अशी सात्त्विक वस्त्रे परिधान करून उत्सवात सहभागी व्हावे.

विद्यार्थ्यांसाठी 'श्रीदत्तात्रेयकवच' पठण ठेवावे, दत्ताचा नामजप करवून घ्यावा.

उत्सवाच्या ठिकाणी कर्णकर्कश संगीत लावणे, विद्युत रोषणाईचा झगमगाट यांसारख्या रज-तम निम ाण करणार्या कृती करू नयेत.

दत्त जयंतीच्या मिरवणुकीत टाळ, मृदुंग अशी सात्त्विक वाद्ये वापरावीत.

**संदर्भ : सनातन-निर्मित ग्रंथ 'दत्त' भाग १**
**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था संपर्क- ९२८४०२७१८०**

# त्रिदेवस्वरूप भगवान दत्तात्रय

आपल्या भारतीय हिंदू संस्कृतीमध्ये भगवान दत्तात्रयांना खूप म हत्व आहे.विशेष करून महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये भगवान दत्तात्रेयांना मानणारा खूप मोठा वर्ग आहे.भगवान दत्तात्रयांच्या अवतारांच्या शक्तीची जाणीव करून देणारी जागृत मंदिरे म हाराष्ट्रात तसेच कर्नाटकात आहेत.भगवान दत्तात्रयांचे अवतार श्रीपाद श्री वल्लभ, स्वामी नृसिंह सरस्वती महाराज, श्री स्वामी समर्थ, अंश अवतार श्री वासुदेवानंद सरस्वती टेम्भे महाराज,दत्त चिले महाराज.तसेच सिध्द दत्तस्थान मंदिरे कुरवपूर, पिठापूर, कर्दळीवन, गाणगापूर, नृसिंहवाडी, औदुंबर, अक्कलकोट इत्यादी.

मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दिवशी मृग नक्षत्रावर श्री दत्त महाराजांचा जन्म झाला,म्हणून त्या दिवशी दत्त जन्मोत्सव सर्व दत्तक्षेत्रांत साजरा होत असतो.पूर्वीच्या काळी भूतलावर स्थूल व सूक्ष्म रूपांत आसुरी शक्ती मोठ्या प्रमाणावर वाढल्या होत्या त्यांना दैत्य म्हटले जात असे.देवगणांनी त्या आसुरी शक्तींना नष्ट करण्यासाठी केलेले प्रयत्न असफल झाले.तेव्हा ब्रह्मदेवाच्या आदेशानुसार वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळया रूपांत दत्त देवतेला अवतार घ्यावा लागला. त्यानंतर दैत्य नष्ट झाले.तो दिवस ऋदत्तजयंती' म्हणून साजरा करतात.दत्तजयंतीचे महत्त्व असे की दत्तजयंतीला दत्ततत्त्व हे पृथ्वीतलावर नेहमीच्या तुलनेत १००० पटीने कार्यरत असते.या दिवशी दत्ताची मनोभावे उपासना केल्यास दत्ततत्त्वाचा जास्तीत जास्त लाभ मिळण्यास मदत होते.या उत्सवापूर्वी सात दिवस गुरुचरित्राचे पारायण करण्याचा प्रघात आहे.यालाच गुरुचरित्रसप्ताह असे म्हणतात.यावेळी दत्तमंदिरामध्ये भजन,कीर्तनादी कार्यक्रम आयोजीत केले जातात.दत्तगुरूंची पूजा,धूप,दीप व आरती करून सुंठवड्याचा प्रसाद वाटप करतात.दत्ताच्या हातातील कमंडलू व जपमाळ ब्रह्मदेवाचे प्रतीक आहे.शंख व चक्र विष्णूचे आणि त्रिशूळ व डमरू शंकराचे प्रतीक आहे.महाराष्ट्रात औदुंबर,नरसोबाची वाडी,गाणगापूर इत्यादी दत्तक्षेत्रांत या उत्सवाला विशेष महत्त्व असते.दत्तजन्म कथा दत्तात्रय हा शब्द 'दत्त' व 'आत्रेय' अशा दोन शब्दांनी बनला आहे.'दत्त' या शब्दाचा अर्थ आपण ब्रह्मच आहोत,मुक्तच आहोत,आत्माच आहोत,अशी निर्गुणाची अनुभूती ज्याला आहे असा.आणि 'अत्रेय' म्हणजे अत्री ऋषींचा मुलगा. श्री दत्तात्रयाच्या जन्माविषयी विविध कथा प्रचलित आहेत.मात्र या सगळ्या कथांमधून श्रीदत्त हे अत्रीऋषी व माता अनुसूया यांचा पुत्र व विष्णूचा अवतार आहे,असाच बोध होतो.अत्रीऋषींनी पुत्रप्राप्तीसाठी ऋक्ष कुलपर्वतावर घोर तपश्चर्या केली. त्यांच्या तपाने सारे त्रिभुवन पोळून निघाले.अत्रीऋषींच्या या प्रखर तपाने संतुष्ट होऊन ब्रह्मा-विष्णु-महेश हे तिन्ही देव प्रकट झाले.आणि त्यांनी अत्रीऋषींना तपाचे कारण विचारले. अत्रीऋषींनी त्यांना विनवले की,आपण माझ्या उदरी पुत्ररूपाने जन्म घ्यावा.तिन्ही देवांनी त्यांची विनंती मान्य केली.देवत्रयीच्या



आशीर्वादाने अनुक्रमे ब्रह्मापासून सोम म्हणजे चंद्र,विष्णूपासून दत्त आणि शिवापासून दुर्वास हे तीन पुत्र अनुसयेच्या उदरी जन्मला आली.श्रीदत्तजन्माची एक कथा ब्राह्मणपुराणात आहे.अत्रीऋषींनी ब्रह्मा-विष्णु-महेश यांची पुत्रप्राप्तीसाठी आराधना केली.ते संतुष्ट झाल्यावर त्यांनी देवांना विनवले की,आपण माझ्या घरी पुत्ररूपाने जन्म घ्यावा आणि मला एक रूपवती कन्याही प्राप्त व्हावी. देवांच्या आशीर्वादाने दत्रात्रेय,सोम,दुर्वास हे तीन पुत्र आणि शुभात्रेयी नावाची कन्या अत्रीऋषींना प्राप्त झाली.याचबरोबर दत्तात्रेयांच्या जन्माची आणखी एक कथा प्रसिद्ध आहे.ती अशी की,राहूने सूर्याला ग्रस्त केले असता सर्व पृथ्वी अंध:कारमय झाली.अत्रीने सूर्याला राहूच्या मगरमिठीतून सोडवले आणि पुन्हा पृथ्वी प्रकाशमान केली.अत्रीच्या या महत्कार्यामुळे संतुष्ट झालेल्या शिव व विष्णु यांनी अनुक्रमे दुर्वास आणि दत्त यांच्या रूपाने अत्रीच्या घरी जन्म घेतला.भारतात शैव,वैष्णव आणि शाक्त हे तीन प्रमुख पंथ आहेत. ती सुमारे हजार ते बाराशे वर्षांपासून श्री दत्तात्रयाची उपासना करत आहेत. संपूर्ण भारतात विशेषत: म हाराष्ट्रात श्रीदत्त आराधणेची उज्ज्वल परंपरा आहे.भगवान दत्तात्रयांचे तीन मुखी रूप सर्वच ठिकाणी प्रचलित आहे कारण त्यांना ब्रह्मा विष्णू आणि महेशाचे रूप मानले जाते.परंतु भरपूर ठिकाणी एक मुखी दत्तांची भक्ती केली जाते.महाराष्ट्रात नारायणपूर (पुणे) येथे एक मुखी दत्त आहेत.भगवान दत्तात्रयांनी दीन दुबळ्यांची सेवा करण्याचे अखंड कार्य केले.भारतीय हिंदू संस्कृतीचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी भारत भ्रमण केले आणि ठिकठिकाणी गादी स्थापन केली.महानुभाव संप्रदाय,नाथ संप्रदाय,वारकरी संप्रदाय,समर्थ संप्रदाय व दत्त संप्रदाय ही पाच संप्रदाय श्री दत्तप्रभुची उपासना करताना दिसतात.श्री दत्त संप्रदायातील साधक 'अवधूतचिंतन श्री गुरूदेव दत्त' असा जयघोष करत असतात.अवधूत हे दत्तात्रयाचे नाव असून या शब्दाचा अर्थ म्हणजे- नेहमी आनंदात रमणारा,प्रत्येक क्षण वर्तमानकाळात जगणारा होय.श्री दत्ताच्या पाठीमागे असलेली गाय म्हणजे पृथ्वी व चार श्वान म्हणजे चार वेदांचे प्रतीक आहे.श्री दत्तगुरूंनी पृथ्वीला आपले गुरु मानले होते.पृथ्वीप्रमाणे सहनशील व सहिष्णु असावे,अशी तिच्याकडून त्यांनी शिकवण घेतली होती.तसेच त्यांनी अग्नीला गुरु माणून आपला देह हा क्षणभंगूर आहे,अशी शिकवण त्यांनी अग्नीच्या ज्वालेपासून घेतली होती.अशाप्रकारे चराचरातील प्रत्येक वस्तूत परमेश्वराचे अस्तित्व आहे.ते पाहण्यासाठी श्रीदत्तगुरूंनी चोवीस गुरु केले होते.श्री दत्त दररोज खूप भ्रमण करीत असत.ते स्नानासाठी वाराणसीला,चंदनाची उटी लावायला प्रयागला जात,तर दुपारची भिक्षा कोल्हापूरला मागत व दुपारचे जेवण पांचाळेश्वर,बीड जिल्हा येथे गोदावरीच्या पात्रात घेत असत.तांबुलभक्षणासाठी मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात राक्षसभुवन येथे जात,तर प्रवचन व कीर्तन ऐकण्यासाठी नैमिष्यारण्यात बिहार येथे पोहोचत. निद्रेसाठी मात्र माहूरगडावर जात व योग गिरनार येथे करीत असता.गुजरात मधील गिरनार पर्वत हे भगवान दत्तात्रयांचे प्रमुख शक्ती स्थान मानले जाते.श्री दत्त अवलिये होते.क्षणात कोठेही अंतर्धान पावत असत.श्री कृष्णांच्या लीलाप्रमाणेच श्रीदत्तात्रयाच्या लीला आहे.'श्रीपाद श्रीवल्लभ' हा दत्ताचा पहिला अवतार,'श्री नृसिंह सरस्वती' हा दुसरा तर 'स्वामी समर्थ हा तिसरा अवतार आहे. सर्वांना दत्त जयंतीच्या भक्तीमय शुभेच्छा.!

**- केतन दत्ताराम भोज**
**- कार्यकारिणी सदस्य - मराठी वृत्तपत्र लेखक संघ, मुंबई**

# क्रीडा निधी प्रकरणी जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांचा खोटा अहवाल

## गावकऱ्यांच्या गंभीर आरोप; निलंबनाची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (उर्दू) च्या क्रीडांगण विकासासाठी मंजूर झालेला रु ७ लाखांचा निधी तत्कालीन मुख्याध्यापकाने हडप केल्याप्रकरणी, भ्रष्टाचाराला पाठीशी घालत खोटा अहवाल देणाऱ्या जालना जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याच्या कारभारावर राममूर्ती येथील समस्त गावकरी आणि शालेय समितीने गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. भ्रष्टाचारी मुख्याध्यापकाला निलंबित होऊनही, त्याला वाचवण्याचा प्रयत्न करणाऱ्या या अधिकाऱ्याला तात्काळ निलंबित करण्याची मागणी गावकऱ्यांनी राज्याच्या क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांकडे केली आहे. मागणी पूर्ण न झाल्यास २६ जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्याचा धमकीवजा इशाराही त्यांनी दिला आहे.

क्रीडा विभागाकडून राममूर्ती येथील शाळेला क्रीडांगण विकासासाठी रु ७ लाख मंजूर झाले होते, त्यापैकी रु ३ लाख निधी शालेय समितीच्या खात्यात वर्ग झाला. तत्कालीन मुख्याध्यापक अब्दुला चाऊस (निलंबित) यांनी हा संपूर्ण निधी क्रीडांगणावर खर्च न करता स्वतःच्या नावे काढून हडप केला. याबाबत गावकऱ्यांनी विचारणा केली असता, मी सर्वांना विकत घेतो, माझे कोणी वाकडे करू शकत नाही, अशा उद्धट भाषेत तो उत्तरे देत होता, असे गावकऱ्यांचे म्हणणे आहे.

**जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याची 'अर्थपूर्ण' चुप्पी?**

या गंभीर भ्रष्टाचाराबाबत गावकऱ्यांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा क्रीडा अधिकारी (जालना) यांच्याकडे लेखी तक्रारी केल्या. मात्र, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाने या तक्रारींची दखल घेतली नाही.

उलटपक्षी, गावकऱ्यांनी वारंवार विचारणा केल्यावर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडून त्यांना तुम्ही खेड्यातील माणसं आहात, तुम्हाला निधीचं काय कळतं, असे बोलून अरेरावीची भाषा वापरली गेली, असा गावकऱ्यांचा आरोप आहे.

जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांनी शाळेला भेट देऊनही क्रीडांगणाचा विकास न झाल्याचे स्पष्ट दिसत असताना, निधी देऊन खूप




दिवस झाल्यामुळे क्रीडांगण दिसत नाही, असे खोटे सांगून वेळ मारून नेली.

याहून गंभीर बाब म्हणजे, त्यांनी प्रशासनाला दिलेल्या अहवालात, मुख्याध्यापकांनी कोणताही भ्रष्टाचार केला नसल्याचे नमूद करून भ्रष्टाचाराला पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला.

गावकऱ्यांचा थेट आरोप आहे की, भ्रष्टाचारी मुख्याध्यापकाने जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांना पैसे देऊन मॅनेज केल्यामुळेच, त्यांनी वारंवार खोटे अहवाल दिले आणि भ्रष्टाचार दडपण्याचा प्रयत्न केला.

**मुख्य कार्यकारी अधिकारींच्या आदेशाने सत्य उघड!**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडून सातत्याने होणाऱ्या दिशाभूलनंतर गावकऱ्यांनी थेट मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना यांची भेट घेतली. त्यांनी तात्काळ चौकशी समिती नेमण्याचे आदेश दिले.

गटशिक्षणाधिकारी कार्यालय, पंचायत समिती जालना यांच्या चौकशी समितीने प्रत्यक्ष शाळेवर येऊन तपासणी केली.

चौकशीतः शाळेत क्रीडांगण उपलब्ध नसल्याचे आणि मुख्याध्यापकाने आर्थिक अनियमिता करून निधीचा भ्रष्टाचार केल्याचे स्पष्टपणे उघड झाले. या चौकशी अहवालाच्या आधारावर जिल्हा प्रशासनाने तात्काळ भ्रष्टाचारी मुख्याध्यापकाला निलंबित केले आहे.

**'चिरीमिरी' घेऊन भ्रष्टाचार दडपण्याचा प्रयत्न**

एका बाजूला प्रशासनाने चौकशी करून भ्रष्टाचार सिद्ध झाल्यावर मुख्याध्यापकास निलंबित केले आहे, तर दुसऱ्या बाजूला जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाने वारंवार खोटे अहवाल देऊन हा भ्रष्टाचार दडपण्याचा प्रयत्न केला. केवळ चिरीमिरी घेऊन भ्रष्टाचार दाबण्याचा हा प्रकार असून, जिल्ह्यात अनेक ठिकाणी अशा पद्धतीने बोगस कामे करून निधी हडपला गेला आहे, असे गावकऱ्यांनी निवेदनात म्हटले आहे.

**गावकऱ्यांचा थेट इशाराः**

भ्रष्टाचारी जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांची तात्काळ चौकशी करून त्यांना निलंबित करण्यात यावे. अन्यथा, आमच्या लेखी तक्रारीची दखल न घेतल्यास, येत्या २६ जानेवारी २०२६ रोजी आम्ही सर्व गावकरी जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे उपोषण करणार आहोत, असा अखेरचा इशारा गावकऱ्यांनी क्रीडामंत्र्यांना दिला आहे. या गंभीर आरोपामुळे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जालना पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे.

# जालन्यात तब्बल ५५० किलो गोवंशीय जातीचे मांस जप्त

### स्थानिक गुन्हे शाखा आणि सदर बाजार पोलिसांची संयुक्त कारवाई; कारवाईमुळे परिसरात खळबळ

**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात तब्बल ५५० किलो गोवंशीय जातीचे मांस जप्त करण्यात आलंय. जालन्याच्या स्थानिक गुन्हे शाखा आणि सदर बाजार पोलिसांची संयुक्त कारवाई केलीय. शहरातील मंगल बाजार भागात झालेल्या या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. या कारवाईत एकूण १ लाख १२ हजार ६०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जालना शहरातील मंगल बाजार भागात काहीसं अवैधरित्या गोवंशीय जातीचे मांस विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे सदर बाजार पोलिसांनी काल दिनांक २ मंगळवार रोजी दोन पंचांसह मंगल बाजार भागात छापा कारवाई केली. यावेळी दोन जणांकडे अवैध गोमांस मिळून आले. यात इलियास इस्माईल कुरेशी यांच्या दुकानात २५० किलो गो मांस, तर फेरोज कुरेशी यांच्या दुकानात ३०० किलो गोमांस मिळून आले. पोलिसांनी दोघांकडे याबाबत विचारपूस केली असता त्यांनी अवैधरित्या गोमांस विक्री करत असल्याचं कबूल केलं. यावरून पोलिसांनी दोघांना ताब्यात घेऊन १ लाख १० हजार रुपये किंमतीचे तब्बल ५५० किलो गोमांस जप्त केले. तसेच या कारवाईत गोमांसचे तुकडे करण्यासाठी वापरण्यात येणारा २०० रुपये किंमतीचा लोखंडी सुरा, ४०० रुपये किंमतीची लोखंडी कुऱ्हाड, २ हजार रुपयांचा वजन काटा देखील पोलिसांनी जप्त केलाय.




याप्रकरणी इलियास इस्माईल कुरेशी (वय ४५ वर्ष) आणि फेरोज कुरेशी या दोघांविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# दोन तरुणाधारदार तलवारी जप्त; २ तरुण पोलिसांच्या ताब्यात

### डीवायएसपी पथक व सदर बाजार डिबी पथकाची संयुक्त कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात पोस्टाद्वारे मागवलेली एक आणि अन्य एक अशा दोन धारदार तलवारी पोलिसांनी जप्त केल्या आहेत. या कारवाईत २ तरुण पोलिसांनी ताब्यात घेतलं असून यापैकी एक इसम हा अल्पवयीन आहे. जालन्याच्या डीवायएसपी पथक व सदर बाजार डिबी पथका ची संयुक्त कारवाई केलीय. जालन्यात एका तरुणाने पोस्टद्वारे तलवार मागवली असल्याची माहिती सदर बाजार पोलिसांना मिळाली होती. त्या माहितीवरून पोलिसांनी पोस्ट ऑफिस परिसरात सापळा रचला. यावेळी पोस्ट ऑफिस मधून एक तरुण आणि एक अल्पवयीन मुलगा असे दोन जण पोस्टाद्वारे मागवलेली तलवार एका खाकी रंगाच्या बॉक्समध्ये घेऊन जाताना पोलिसांना आढळून आले. पोलिसांनी



दोघांना थांबवून खाकी डब्यातील साहित्याबाबत विचारपूस केली असता त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली. त्यावरून पोलिसांनी डबा उघडला असता त्यात एक धारदार तलवार मिळून आली. त्यावरून पोलिसांनी रेहान शेख सलीम वय १८ वर्ष आणि एक अल्पवयीन बालक या दोघांना ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांच्याकडे अधिक विचारणा केली असता यातील एकाने घरी असलेल्या दुसऱ्या तलवारीची माहिती पोलिसांना दिली. त्यावरून पोलिसांनी दुसरी तलवारही जप्त केली आहे. याप्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

सदरची कामगीरी पोलीस निरीक्षक संदीप भारती यांचे मार्गदर्शनाखाली सदर बाजार डी. बी. पथकाचे प्रमुख पोउपनि शैलेश म्हस्के, पोउपनि हरिष राठोड, पोहेकॉ रामप्रसाद रंगे, पोकों परमेश्वर धुमाळ, पोकां सागर खैरे, पोकॉ दुर्गेश गोफणे, पोकों विशाल काळे, पोको इम्रान खान यांनी केली.

# दिव्यांगांसाठी मदत केंद्र कार्यान्वित करणार - जिल्हाधिकारी मित्तल

### लायन्स क्लब आणि मनपातर्फे ३९५ दिव्यांगांची आरोग्य तपासणी

**जालना । प्रतिनिधी –** शारीरिक दृष्ट्या कमजोर असले तरी सक्षम असलेल्या दिव्यांगांना मदत करण्यास प्रशासन सदैव तत्पर असून दिव्यांगांनी मनाने सक्षम व्हावे त्यांच्या मदतीसाठी स्वतंत्रपणे दिव्यांग मदत केंद्र आगामी काळात कार्यान्वित करणार असल्याची घोषणा जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी आज केली.



आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिनानिमित्त बुधवारी ( ता ०३) लायन्स क्लब ऑफ जालना आणि जालना शहर महानगरपालिकेच्या वतीने मनपा कार्यालयात दिव्यांगांसाठी आयोजित मोफत आरोग्य व नेत्र तपासणी शिबिर शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी जिल्हाधिकारी मित्तल बोलत होत्या. यावेळी उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे ,समाज कल्याण अधिकारी स्नेहल मुधाळे ,अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम ,लायन्स क्लब ऑफ जालना चे अध्यक्ष राधेश्याम टिबडेवाल ,सचिव राजेश खिस्ते,कोषाध्यक्ष रतन बजाज,डॉ. गिरीश पाकणीकर,अरुण मित्तल,प्रकल्प प्रमुख डॉ.संगीता राजे –देशमुख,द्वारकादास मुंदडा , डॉ. प्रकाश सिगेदार,उपायुक्त नंदा गायकवाड,सहाय्यक आयुक्त केशव कानपुडे,अनुराधा नागोरी,अपर्णा जाधव,आलेक जेकब, सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे,लायन्स क्लबचे बळीराम बेंद्रे, पी.के .खरात, विठ्ठलराव दराडे , बोरूडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी मित्तल म्हणाल्या, दिव्यांगांच्या भावना प्रशासनापर्यंत पोहोचण्याकरिता जिल्हा सामान्य रुग्णालय परिसरात सेंटरची उभारणी केली जाणार असून दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी जिल्हा नियोजन विकास समिती, महानगरपालिका यांच्या माध्यमातून विशेष निधी राखीव ठेवण्यात आला आहे. यातून नियमात बसणारे विकासात्मक कार्य केले जातील असे नमूद करत तालुका स्तरावर गट संसाधन केंद्रासाठीही निधीची तरतूद केली असल्याचे जिल्हाधिकारी मित्तल यांनी सांगितले.शिक्षण आणि रोजगार यावर दिव्यांगांनी लक्ष केंद्रित करावे असे आवाहन जिल्हाधिकारी मित्तल यांनी केले.

उपायुक्त नंदा गायकवाड यांनी कामानिमित्त मनपा कार्यालयात येणाऱ्या दिव्यांगांसाठी विल चेअर उपलब्ध करून दिली असून खालच्या मजल्यावरच कार्यालय स्थलांतरित केली जाईल असे गायकवाड यांनी सांगितले.

डॉ.प्रकाश सिंगेदार यांनी अस्थिव्यंग आणि जन्मतः दिव्यांगाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आढळते. शासन, स्वयंसेवी संस्था यांनी दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करावे असे त्यांनी नमूद केले.

सकल दिव्यांग संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे यांनी डीपीडीसी, समाज कल्याण, महानगरपालिकेकडून दिव्यांगांसाठी राखीव निधी ठेवला जात असला तरी योग्य प्रमाणात खर्च होत नसल्याचे सडेतोड मत त्यांनी व्यक्त केले. शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहर प्रमुख विष्णू पाचफुले ,मीनाक्षी दाड, विजय दाड,
यांनी भेट देऊन दिव्यांगांचा सत्कार केला.

सुत्रसंचालन डॉ.दीपक भालेराव यांनी केले तर प्रमिला मोरे यांनी आभार मानले. यावेळी मोहन मुंडे अनिल मगदूले सतीश फतपुरे सतीश वाघ यासह मनपाचे कर्मचारी दिव्यांग बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**३९५ जणांना लाभ....!**

दिवसभर चाललेल्या मोफत नेत्र व आरोग्य तपासणी शिबीरात ८९ दिव्यांगांची नेत्र तपासणी करण्यात आली. कॅट्रॅक्ट ऑपरेशन चे रुग्ण ६ आढळून आले.आरोग्य तपासणी (७०),रक्त तपासणी(२२), करण्यात आली.१३३ जणांना क्षयरोगबाबत मार्गदर्शन करून ८१ जणांचे आयुष्मान कार्ड काढण्यात आले.एकूण ३९५ दिव्यांग बांधवांनी शिबीराचा लाभ घेतला.

### जालना- जळगाव रेल्वे प्रकल्पातील भुसंपादनास नवी दिशा

# उच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे २०१३ च्या कायद्यानुसार नुकसानभरपाईची आशा

**जालना। प्रतिनिधी -** जालना ते जळगाव (१७४ कि.मी.) या महत्त्वाकांक्षी 'अजंता गुफा रेल्वे जोडणी' प्रकल्पासाठी होत असलेल्या भुसंपादन प्रक्रियेत मोठी घडामोड झाली आहे. संबंधित जमीनमालकांच्या विविध आक्षेपांचा विचार न झाल्यामुळे दाखल करण्यात आलेल्या रिट याचिकांवर सुनावणी घेत मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने सर्व संबंधित विभागांना नोटीस जारी करून चार आठवड्यात शपथपत्र दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. न्यायालयाच्या या आदेशामुळे जमीनमालकांना भूसंपादन अधिनियम २०१३ नुसार (बाजारभावाच्या पाचपट नुकसानभरपाईची) आशा निर्माण झाली आहे.

**कोठे होत आहे भुसंपादन?**

उपविभागीय अधिकारी (भुसंपादन) भोकरदन यांच्या माध्यमातून जालना व भोकरदन तालुक्यातील जमीन व मालमत्ता धारकांना मोजणीसाठी नोटिसा देण्यात आल्या होत्या. या प्रकल्पामध्ये मोठ्या प्रमाणात शेती जमीन, घरकुल व इतर मालमत्ता संपादित होणार आहेत.

**जमीनमालकांची प्रमुख मागणी**

मालमत्ताधारकांनी अनेक मुद्द्यांवर आक्षेप नोंदवले असून त्यातील महत्त्वाचे मुद्दे असे रेल्वे अधिनियम २००८ प्रमाणे मिळणारी नुकसानभरपाई अत्यल्प असल्याची तक्रार. भूमी अधिग्रहण कायदा २०१३ नुसार ग्रामीण भागात ४ पट व शहरी भागात २ पट, तर काही प्रकरणांमध्ये बाजारभावाच्या ५ पट नुकसानभरपाई देण्याची मागणी. भोकरदन शहरालगत होणारे भुसंपादन थांबवून, सर्व्हेमध्ये नोंद असलेल्या गावापासून दूरच्या पर्यायी मार्गावरूनच रेल्वे मार्ग घ्यावा अशी मागणी. भोकरदनसाठी आधीच मंजूर झालेल्या वळण रस्त्याच्या नियोजित गट नंबरमधील जमिनीमधूनच पुन्हा भुसंपादन करण्यास विरोध. जमीनमालकांच्या आक्षेपांकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप.

**उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका**

सोयगाव, भोकरदन, क्षिरसागर व नांजा येथील काही जमीनमालकांनी ॲड. विष्णु यादवराव पाटील यांच्या मार्फत मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे रिट याचिका दाखल केली आहे.



या याचिकेत २०१३ च्या कायद्यानुसार नुकसानभरपाई मंजूर करावी, पर्यायी सर्व्हे मार्गाचा विचार करावा, आधीच मंजूर वळण रस्त्याचा विचार न करता मार्ग बदलू नये, जमिनींच्या मोजणीविषयी दिलेल्या नोटिसा रद्द कराव्यात या मागण्या करण्यात आल्या.

**न्यायालयाचा महत्त्वपूर्ण आदेश (दि. २०/११/२०२५)**

सुनावणीदरम्यान न्यायालयाने सर्व संबंधित विभागांना नोटीस बजावली. ४ आठवड्यांत शपथपत्र सादर करण्याचे आदेश दिले. याचिकाकर्त्यांच्या मुद्द्यांचा प्रत्यक्ष विचार व्हावा यावर भर दिला. भुसंपादन प्रक्रियेत पारदर्शकता ठेवण्याचे निर्देश दिले. या आदेशामुळे प्रभावित जमीनमालकांमध्ये समाधानाचे वातावरण असून २०१३ कायद्यानुसार नुकसानभरपाई मिळण्याची आशा आता अधिक बळकट झाली आहे.


**कायदेशीर प्रक्रिया काय सांगते?** भुसंपादन अधिनियम, २०१३ नुसार, न्याय्य बाजारमूल्य, पुनर्वसन व पुनर्स्थापना हक्क, विशेष परिस्थितीत ४ ते ५ पट नुकसानभरपाई देणे.

सुनावणी आणि आक्षेप निवारणाची हमी असे स्पष्ट नियम आहेत. यावर रेल्वे अधिनियम २००८ पेक्षा अधिक लाभ मिळतात.

चार आठवड्यांत शासनाने व संबंधित रेल्वे विभागाने शपथपत्र सादर केल्यानंतर न्यायालयात पुढील सुनावणी होईल. त्यानंतर- २०१३ कायदा लागू होणार का? नुकसानभरपाई वाढणार का? मार्ग बदलासंबंधी निर्णय काय? यावर न्यायालय महत्त्वाचा निर्णय देणार आहे.

# त्रिगुणात्मक त्रिमूर्ती दत्तात्रेय; जन्मोत्सव, उपासना, दत्तयाग फल

मार्गशीर्ष पौर्णिमा म्हणजेच त्रिगुणात्मक त्रिमूर्ती दत्तात्रयाचा जन्मदिवस. त्रिगुणात्मक त्रिमूर्ती दत्तात्रयांचा जन्म कथा अनेक सांगितल्या जातात, त्यापैकीच एक जन्म कथा म्हणजेच पुढील प्रमाणे, एका सिद्धयोगाने एका नामधारकाला सांगितलेली ही कथा आहे, सिद्ध योगाने नामदारकाला सांगितले की तुला मी कथा सांगण्यापूर्वी, अत्रि ऋषी कोण होते हे सांगणे गरजेचे आहे. सृष्टी निर्माण होण्यापूर्वी सर्व जलमय होते. त्यात हिरण्य गर्भ झाले. तेच रजगुणापासून निर्माण झालेला ब्रह्मा. त्यालाच ब्रम्हांड म्हणतात. मग त्याचे दोन तुकडे झाले. तेथे वरती आकाश खाली भूमी तयार झाली. असे ते दोन भाग. ब्रह्मणी तेथे १४ भुवन निर्माण केली. त्यात दाही दिशा, मन, बुद्धी, वाणी, काम क्रोधादी., असे षडविकार उत्पन्न केले. सृष्टीची रचना करण्यासाठी सात मानसपुत्रे तयार केली. ती असे मरीची,, अत्रि, अंगीरस, पुलस्त्य,कृतू आणि वशिष्ठ. सात ऋषी. त्यात अत्रि ऋषींची अनुसया ही पत्नी. ही श्रेष्ठ प्रतिव्रता होती. साक्षात जगदंबा. तिच्या लावण्या रूपाचे वर्णन करता येणारच नाही. और प्रतिव्रता असल्याने तिच्या पती सेवा पाहून ती स्वर्गाचे सर्व ऐश्वर्या घेईल की काय अशी भीती सर्व देवांना वाटू लागली. सर्व देव इंद्रा सहित ब्रह्मा विष्णू महेश या त्रयीना भेटली. आणि अत्रे अनुसयांची सर्व हकीगत सांगितली. इंद्र देव म्हणाले, महा तपस्वी अत्रि ऋषींची पत्नी अनुसया असामान्य प्रतिव्रता आहे. ती काया वाचा मनाने अति त्यांची पूजा करते. ती कुणालाही विणमुख करीत नाही. चे अलौकिक आचरण पाहून सूर्य सुद्धा तिला घाबरतो. तिला उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून तो मंद मंद तापतो. अग्नी थंड होतो, शितल होतो. मला सुद्धा भीतीने मंद मंद वाहतो. च्या पायांना त्रास होऊ नये म्हणून तुम्ही सुद्धा मृदू होते. ती शाप देईल अशी भीती आम्हा सर्वांना वाटते. कोणत्याही देवाचे स्थान खाऊन घेईल अशी भीती आम्हाला वाटते. यावर काही उपाय करा




टेंभुर्णीच्या यात्रेतील सुंदर असे चित्र, संतोष आवटी यांच्या कुंचल्यातून

नाहीतर स्वर्ग जाईलच त्याचबरोबर आम्हाला तिच्या दारात जेव्हा चाकरी करावी लागेल. तेव्हा हे ऐकून ब्रह्मा विष्णू महेश भयंकर रागावले. ते म्हणाले चला आत्ताच आपण तिच्याकडे जाऊ. तिच्या पतिव्रत्याचा भंग करू आणि तिला पृथ्वीवरच ठेवू. असे आश्वासन देऊन सर्व देवांना निश्चिंत ठेवून सती अनुसयाचे सत्व पाहण्यासाठी ब्रह्मा विष्णू महेश पृथ्वीतलावर आले. नंतर अति ऋषीच्या आश्रमात गेले. तेव्हा अत्रि ऋषी अनुष्ठानासाठी बाहेर गेलेले होते. अनुसया आश्रमात एकटीच होती. अनुसयाला हाक मारून म्हणाले माई आम्ही ब्राह्मण अतिथी म्हणून आलो आहोत. आम्हाला भूक लागली आहे. आम्हाला भिक्षा वाढ तुमच्या आश्रमात सतत आंदन चालू असते. अतिथी अभ्यंगताना अच्छा भोजन दिले जाते असे आम्ही ऐकले आहे. म्हणून आम्ही मोठ्या आशेने आलेलो आहोत. आम्हास लवकर भोजन दे, नाहीतर आम्ही परत जातो तीन भिक्षेकरी आपल्या दारात आल्याचे पाहून अनुस्येला अत्यानंद झाला. तिने त्यांचे स्वागत करून त्यांचे पाय धुतले. बसावयास दिले. यांना अर्ध पाद्य देऊन, गंध अक्षता पुष्पांनी त्यांची पूजा केली. हात जोडून म्हणाली, आपण स्नान करून या, पर्यंत मी पान वाढते,. तेव्हा ते भिक्षुक म्हणाले आम्ही स्थान करूनच आलेलो आहोत. आम्हाला लवकर भोजन दे. तेव्हा अनुसया म्हणाली ठीक आहे. ते म्हणून अनुसयाने त्यांना बसावयास पाठ दिली. पाने मांडली व अन्न आढावयास सुरुवात केली. तेव्हा भिक्षुक म्हणाले, माई आम्हाला चे भोजन नको, आम्हाला इच्छा भोजन हवे आहे. तुझ्या सौंदर्याची कीर्ती आम्ही ऐकली आहे. जे विवास्त्र सौंदर्य पहावे असे आमची इच्छा आहे. म्हणून आम्हाला अंगावर वस्त्र न ठेवता भोजनवाढ, नाहीतर आम्ही परत जातो त्या भिक्षुकांचे हे शब्द ऐकून अनुसया आश्चर्यचकित झाली. ती परमज्ञानी सती साध्वी होती. दिनेश ओळखले हे कोणी साधेसुधे भिक्षुक नाही. आपली परीक्षा पाण्यासाठी ही देवच आले आहेत. काहीतरी अशी विचित्र मागणी कोण कशाला करेल? आता हे जर परत गेले तर पतीच्या आज्ञेचा भंग होईल. दिवस तर होऊन भोजन वाढले तर प्रतिव्रत्रीचा धर्म मॉडेल. माझे मन निर्मळ आहे. तिचे तपोबलच मला संकटातून तारुण्य असा विचार करून भिक्षुकांना म्हणाली तथास्तु असे म्हणून आत गेली. आपल्या पतीचे स्मरण केले पतीची मनातून पूजा केली. तीर्थाचे भांडे घेऊन बाहेर आली. मग तिने आपल्या पतीचे परत स्मरण करून तीर्थ त्या एनी भिक्षुकांच्या अंगावर शिंपडले. आणि काय आश्चर्य! त्याच क्षणी त्या तीन भिक्षुकांचे तीन तेजस्वी सुंदर बाळे तयार झाले स्वतःला सावरून त्या तीनही बाळांना ती मांडीवर घेऊन तुपटू लागली. अंगाई गीत गाऊ लागली. ही बाळे भुकेने व्याकुळ होऊन रडत होती. आता अन्नाची गरज नव्हती तर आईच्या दुधाची गरज होती. त्याचवेळी अनुसयाला वासल्याने पाना फुटला, तिने बाळांना स्तनपान देऊन शांत केले. तिने त्या बाळांना पाळण्यात नेऊन शांतपणे झोपविली. या विश्वाची उत्पत्ती, स्थिती, लय करणारे ब्रह्मा विष्णू महेश अनुसयाच्या तपोबलाने तिने बाळे झाली. तिच्या स्तन पानाने त्यांची भूक शमली . दुपारी अत्रि ऋषी अनुष्ठान संपून आश्रमात आले. पाळण्यातील तीन बालके पाहून त्यांना आश्चर्य वाटले. अनुसयाने त्यांना सर्व हकीगत सांगितली. हे तिन्ही बालके ब्रह्मा विष्णू महेश आहेत हे अंतर ज्ञानाने जाणले. किंवा ब्रह्मा विष्णू महेश हे श्री ऋषीपुढे प्रकट झाले व त्यांना वर माघ असे म्हणाले. तेव्हा ते अनुसयाला म्हणाले त्रिमूर्तीआपल्यावर प्रसन्न झाली आहे. तेव्हा इच्छा असेल तो वर मागून घे. तेव्हा अनुसया हात जोडून म्हणाली, नात हे तिन्ही देव तुमच्या तपश्चर्येने प्रसन्न होऊन येथे आलेले आहेत. तुम्ही त्यांच्याकडून पुत्र मागून घ्या. किंवा अतिरुची त्या तीन देवांना म्हणाले देवश्रेष्ठांनो, बालरूपात माझ्या आश्रमात आला, तर पुत्ररूपाने इथेच रहा तेव्हा तथास्तु म्हणून तिने देव स्वस्थ आणि निघून गेले. मग ब्रह्मदेव चंद्र झाला. श्री विष्णू दत्त झाला. आणि महेश दुर्वास झाला. काही दिवसांनी चंद्रदुर्वास मातेला म्हणाले आम्ही दोघे तपाला जातो. तिसरा दत्त इथेच राहतो. तोच त्रिमूर्ती आहे असे समज. अनुसयाने त्यांना आज्ञा दिली व चंद्र आणि दुर्वास तपासाठी निघून गेली. त्रिमूर्ती दत्त मात्र आईची वडिलांची सेवा करण्यामध्ये तिथेच राहिले. ब्रह्मदेव आणि शंकराने आपापले अंश दत्तात्रयाच्या मध्ये सोडले. तेव्हापासून दत्तात्री अनुसयाचा पुत्र, श्री विष्णूचा अवतार असूनही त्रिमूर्ती दत्तात्रेय एकच वाणी राहिले अत्री म्हणून आत्रेय आणि आत्री अनुसयाला देवाने दिलेला म्हणून दत्त, असा दत्तात्रेय महाप्रभू. हेच गुरुपरंपरेचे मूळ पीठ असून, गुरुपरंपरा महाप्रभू दत्तात्रेय पासून सुरू झाली. दत्तात्रयाचा हा अवतार पौर्णिमेला झाला म्हणून दत्तात्रयाचा जन्मोत्सव म ार्गशीर्ष पौर्णिमेलाच साजरा करतात.

**दत्त उपासना व पादुका:** दत्तपादकांना नम स्कार कसा करावा, याची एक पद्धत आहे, पादुका शिव आणिशक्ती असणे नमस्कार करताना त्रास होऊ नये म्हणून, पादुकांच्या खुंट्यावर डोके न ठेवता पादुकांच्या पुढच्या भागावर डोके ठेवून नमस्कार करणे. डावी पादुका ही शिवस्वरूप आणि उजवी पादुका ही शक्ती स्वरूप असते. डावी पादुका म्हणजे ईश्वराची अप्रकट तारक शक्ती, तुझी पादुका म्हणजे ईश्वराची अप्रकट मारक शक्ती. पादुकांच्या अंगठ्यातून पादुकांच्या कोणत्या आवश्यकतेप्रमाणे स्वराची तारक आणि मारक शक्ती बाहेर पडत असते. ज्यावेळेस आपण पादुकांच्या अंगठ्यावर डोके टेकवतो त्यावेळेस त्यातून निर्माण होणाऱ्या शक्ती अण्णा पेलू शकल्याने आपणास त्रास होऊ शकतो म्हणून पादुकांच्या अंगठ्यावर डोके न ठेवता त्यांच्या समोरच्या भागावर( जेथेसंतांच्या पायांची बोटे येतात) येथे टेकवावे. श्री दत्तात्रेयांच्या उपासनेत अनेक ठिकाणी पादुकांच्या पूजनास महत्त्व आहे श्री दत्तात्रेय गुरु स्वरूपात सर्वत्र आढळत असल्यामुळे त्यांच्या चरण पूजेच्या महिमा वाढलेला आहे. दत्त संप्रदायामध्ये गुरुपेक्षा गुरुचरणांनाच महत्त्वाचे स्थान आहे. दत्तपंथयात श्री गुरु व त्यांच्या चरण पादुका यांना फार महत्त्व आहे. गुरूंच्या व इष्ट देवतांच्या पादुका पूजनाचा प्रकार फार पूर्वीपासूनचा आहे. श्रीराम वनवासात असताना भरताना त्यांच्या पादुका सिंहासनावर ठेवून आदरभाव दर्शीला होता. अतिशय प्रिय व्यक्ती विषयी थोर व्यक्ती विषयी आदर दाखविणे म्हणजेच त्यांच्या पायावर डोके ठेवणे. त्यातील आणखीन एक रहस्य असे की, श्रेष्ठ सत्पुरुषांची सर्व दैवशक्ती त्यांच्या चरणात एकवटलेली असते. त्याच्या चरणस्पर्शाने कंपनाद्वारा ती शक्ती भक्तात संचारत असल्याचा अनेकांना अनुभव आलेला आहे. म्हणूनच अनेक दत्त संस्थानात दत्तमूर्ती पेक्षा दत्तपादकांना महत्त्वाचे स्थान मिळाले आहे. गिरनार शिखरावर दत्तात्रेयांच्या पादुकाच आहेत. गाणगापूर येथे नरसिंह सरस्वती यांनी निर्गुण पादुकास मागे ठेवल्याची कथा आहे. सिंह वाडीला सुद्धा दत्त पादुकांची पूजा केली जाते. देवगिरीवर जनार्दन स्वामींच्या समाधी स्थानी पादुकाच आहेत. विष्णूचा जसा शालिग्राम आहे सात दत्त उपासनेत दत्तांच्या पादुकांना महत्त्वाचे स्थान आहे. म्हणून रक्तपादुकांचे पूजा सगुण आणि निर्गुण स्वरूपात केली जाते. मी ठेवतो मस्तक ज्या ठिकाणी! येथे तुझे सद्गुरु पाय दोन्ही!!

**दत्तात्रयाची आरती, चैतन्य अविष्कार:** दत्तात्रयाची आरती संत एकनाथ महाराजांनी रचलेली असल्याने



चित्रकार संतोष आवटी टेंभुर्णीकर चित्रित श्री दत्तात्रेयांची मूर्ती

तिच्यामध्ये चैतन्य ओत प्रोत भरलेले आहे. ईश्वराविषयीची दृढ श्रद्धा असलेल्यांनी ही आरती म्हटलेली असून वाद्यांचा निवृत्त उपयोग केलेला असून, मुळे आरती भावपूर्ण झाली आहे. या आरती मधील शब्दांचा भाव जर आपण समजून घेतला गुरुदत्तात्रेयांबद्दल चे यशस्वी आपल्याला समजण्यास मदत होईल, श्री गुरुदत्तात्रेयांबद्दलची भक्ती वाढण्यास मदत होईल.

१) त्रिगुणात्मक त्रिमूर्ती दत्त हा जाणा:- याचा अर्थ दत्त हा त्रिगुणात्मक आहे म्हणजे कार्यात्मक आहे. त्रिमूर्ती आहे. श्री दत्तात्रयांचा जन्म ब्रह्मा विष्णू म हेश त्यांच्या आयुष्यापासून झालेला आहे. तीन देव उत्पत्ती स्थिती लय यांच्याशी संबंधित असल्यामुळे देव वास्तूत : त्रिगुणातीत असूनही कार्यानुसार गुनाश्रयी आहेत, अनुक्रमे रज, सत्व, तम या तीन गुणांना आश्रय देतात.

२)नेती नेती शब्द न ये अनु माना!:- याचा भावार्थ वेदांनी श्री दत्तात्रयांचे स्वरूप आनंद करण्याचा प्रयत्न केला आहे परंतु त्यांनी काहीच अनुमान न करता आल्याने, मेथी नेते म्हणजे असे नाही, असेही नाही, एवढेच ते सांगू शकले.

३) सबाह्य अभ्यंतरी तू एक दत्त!:- म्हणजे आत बाहेर पूर्ण तू एक दत्त, केवळ गुरुतत्त्व रूप, ईश्वर तत्व असलेला आहे.

४) अभंग्याशी कैची कळेल ही मात!:- म्हणजे आम्हा अभागी दुर्दैवी लोकांना तुझे महात्म्य कसे कळेल.

५)पराही परतली तेथे कैचा हेत!:- म्हणजे दत्ताचे वर्णन करायला गेलेली परा वाणीही परत फिरली कोणता हेतू असावा बरे. दत्तावताराचे स्वरूप तुर्या अवस्थेच्या पलीकडे असल्याने परावाणी ही परत फिरली. तिथे पोहोचू शकली नाही म्हणून काही न बोलता परत फिरली.

६)जन्ममरणाचा पुरलासी अंत!:- त्याचा भावार्थ असा आहे की श्री दत्तात्रयाचे नित्य निरंतर आनंदी असल्याने अनंत असल्याने, ते जन्म मरण हे शब्द संपतात.

७)जन्ममरणाचा फेरा चुकविला!:- त्याचा भावार्थ असा आहे जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका झाली आहे. तुला मोक्ष दिला आहे असा आहे.

८)मी तू पणाची झाली बोळवण!:- त्याचा भावार्थ असा आहेकि अद्वैतावस्था प्राप्त झाल्याने मी तू पणाची आप पर भाव संपला आहे.

असा आरतीचा भावार्थ समजून घेतल्यानंतर आपल्या मनी सुद्धा भाव निर्माण होऊन श्री दत्तात्रयाची पूजा आणि भक्ती भाव निर्माण व्हावा हीच दत्तात्रय चरणी प्रार्थना आहे.

**दत्तयागाचे फल:** आर्य सनातन वैदिक हिंदू धर्मात गुरुपरंपरेला फार महत्त्व आहे. दत्त महाराजांपासून ही परंपरा सुरू झाली आहे मानले जाते. याग या शब्दाची व्याख्या पाहू, आपण दत्तयागाचे फल विषयी जाणून घेऊ. देवतांच्या उद्देशाने केलेला हवीर द्रव्यांचा त्याग यालाच याग असे म्हटले जाते. दत्त महाराजांचा उतार का झाला हे कळले की मग बरेच सुलभ होईल. राम कृष्ण नरसिंह वगैरे अवतार हे दृष्टांचे राक्षसांचे निरदालन करण्याकरता झाले, दत्ताने अवतार घेऊन कोणत्या राक्षसांचा वध केला? दत्त चरित्रात याचा उल्लेख नाही. अवताराचे कारण काय? स्वतःच्या शरीरात काम क्रोध लोभ, मोह, मद, मत्सर, दंब दर्प अभिमान, सर्व रिपोर्ट नष्ट करावेत यासाठी हा अवतार झाला. बाकीच्या उतारा देवतांनी राक्षसातील दुराचारी मारून जनहितिमुक्त केले. पण या दत्ता उतारात लोकांमधील दुर्गुण नष्ट व्हावे हेतू होता. आधी दैविक, आधी भौतिक, अध्यात्मिक तापत्रय, कारण होण्याकरता काम क्रोधादीरपुंचा नाश होऊन.. असाध्य ते साध्य, वागमित्व, सर्व प्राणी मात्र वश व्हावेत, संपत्ती, भू मंडळाचे अधिपत्य, सर्व भय चिंता, परिहार व्हाव्यात त्याकरता दत्तप्रभूंचा कृपेने अध्यात्मिक गतीप्राप्ती होऊन पुढे सद्गुरूंची कृपा व्हावी यापुढे मोक्षमार्गात सुलभ व्हावा हेतूने जे स्मृतुगामी आहेत केवळ म रणमात्राने संतोष ले जातात, महाभय्यांच्या बिहार करतात, ज्ञानदेतात, नेहमी चिदानंद मग्न राहतात, बालोन मत पिशाच्च कोणत्याही अवस्थेत असतात व माता अनुसूयेस आनंद देतात त्या दत्तमहाप्रभूंची कृपा व्हावी त्यासाठी दत्तयाग करतात. दत्ता अवतार लोकोदरासाठी चिरंजीव राहिलेला आहे. आयोनी संभव आहे असेही सांगितले जाते. अवताराचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ब्रह्मा विष्णू महेश या तीन प्रमुख देवता व त्यांच्या परंपरेचे ऐक्य. तिची उभारणी जोपासना आणि संहार त्यासाठी कार्यरत असलेल्या तीन देवतांचे एकतरुप म्हणजे स्त्री दत्तात्रेयांचा अवतार असे मानले जाते. दत्तात्रेय तसेच दत्त संप्रदायांचा नाथ महानुभव वारकरी रामदासी सकलमत देवी आदी उपासना पंताशी ही संपर्क असल्याचे दिसून येते. अशा दत्तात्रेयांचे आज जयंती आहे त्यानिमित्त केलेला हा भक्तरुपी, खटाटोप आहे.



**दत्तभक्त प्रा दत्ता देशमुख, टेंभुर्णीकर**

# जालना येथे अनिवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील अनुसुचित जाती प्रवर्गातील सुशिक्षित युवागटातील महिला-पुरूषासाठी निःशुल्क एक म हिना कालावधीच्या अनिवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन जालना येथे करण्यात आले आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाम ध्ये उद्योजकीय प्रेरणा, उद्योजकीय गुणसंपदा, विविध संधी मार्गदर्शन, उद्योगाची निवड, उद्योगाचे व्यवस्थापन, उद्योगाला आवश्यक विविध परवाने, शासकीय व निमशासकीय विविध कर्ज योजना, खेळत्या भांडवलाचे व्यवस्थापन, बाजारपेठ पाहाणी, प्रकल्प अहवाल तयार करणे, बँकेची कर्ज प्रक्रिया, उद्योगांना भेटी, सिध्दी प्रेरणा प्रशिक्षण आदीबाबत सविस्तर म ार्गदर्शन केले जाईल. तसेच प्रशिक्षण पश्चात उद्योग सुरू करण्यासाठी हॅन्ड होल्डिंग सपोर्ट महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रामार्फत केला जाईल. सदरील प्रशिक्षणाम ध्ये सहभागी होण्यासाठी प्रशिक्षणार्थी हा फक्त अनुसूचित जाती प्रवर्गातील असणे आवश्यक आहे. प्रशिक्षणार्थीकडे जातीचे प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र, आधार कार्डची छायांकित प्रत असणे गरजेचे असून उमेदवार हा १८ ते ५० या वयोगटातील असावा. इच्छुकांनी सदरील कार्यक्रमांच्या अधिक माहिती व प्रवेश अर्जाकरिता जातीचे प्रमाणपत्र, आधार कार्डची झेराक्स, टी.सी व पासपोर्ट साईज फोटोसह इच्छुकांनी प्रवेश अर्ज व अधिक माहिती साठी दि.८ डिसेंबर २०२५ पुर्वी कार्यक्रम आयोजक एमसीईडीचे दिलीप शिलवंत मो.८०८७२८३०६५ किंवा मराठा पार्क बिल्डिंग, विशाल कॉर्नर, छत्रपती संभाजीनगर चौफुली, जालना. फोन नं. ०२४८२- २२०५९२ येथे संपर्क साधावा. असे प्रकल्प अधिकारी, एमसीईडी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

दत्त जयंतीच्या सर्व नागरिकांना
हार्दिक शुभेच्छा



डॉ. आनंद भाले
विघ्नहर्ता क्लिनिक
टेंभुर्णी, ता. जाफ्राबाद जि. जालना



गौरव देशमुख
बीएससी, नर्सिंग



विशाल देशमुख
मोरया मेडीकल
टेंभुर्णी, ता. जाफ्राबाद जि. जालना

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.